**अर्ज (औ.वि.का.) क्र. ४/२०२६**

**सि.एन.आर. नं. एमएचएलसी२८००००२८—२०२६**

**आदेश नि. सी—९**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी दाखल केला असुन असे कथन केले आहे की, त्यांच्या विरुध्द पारीत झालेला लेखी कैफीयत नाही हा आदेश रदद् होवुन अभिलेखावर लेखी कैफीयत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी. प्रतिवादी क्र. २ यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास विलंब झाला कारण, काही अपरिहार्य कारणांमुळे प्रकरणात हजर राहुन विहित मुदतीत लेखी जबाब दाखल करणे शक्य झाले नाही आणि त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांना अभिलेखावर लेखी कैफीयत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

२) प्रस्तुतच्या अर्जावर अर्जदारांनी जोरदार हरकत नोंदवुन असे स्पष्ट केले आहे की, मुळातच प्रतिवादी क्र. २ यांना वारंवार संधी देवुन देखील अभिलेखावर लेखी कैफीयत निर्धारित वेळेत दाखल करण्यात त्यांना अपयश आले, त्यामुळे त्यांच्या विरुध्द आदेश पारीत करण्यात आला जो योग्यच होता आणि म्हणुन हा अर्ज पुर्णपणे फेटाळण्याकरीता पात्र ठरतो.

३) दोन्ही पक्षांचे कथन आणि अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे बारकाईने आणि सुक्ष्म पध्दतीने अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, या प्रकरणात प्रतिवादी क्र. २ यांचेतर्फे दि. २४/०२/२०२६ रोजी वकीलपत्र दाखल करण्यात आले आणि त्यांच्या लेखी कैफीयत करीता प्रकरण नेमण्यात आले आणि दि. १०/०३/२०२६ ला नि. सी—४ खाली

प्रतिवादी क्र. २ यांना लेखी कैफीयत दाखल करणेसाठी शेवटची संधी म्हणुन दि. १७/०३/२०२६ ही तारीख देण्यात आली आणि त्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांना लेखी कैफीयत दाखल करण्यात अपयश आल्यामुळे त्यांच्या विरुध्द लेखी कैफीयत नाही हा आदेश पारीत करण्यात आला आणि आता म्हणजे दि. २८/०७/२०२६ रोजी प्रतिवादी क्र. २ अभिलेखावर लेख कैफीयत दाखल करण्यासाठी परवानगी देण्यात यावी म्हणुन अर्ज करतात, परंतु या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २ यांना एवढा विलंब लेखी कैफीयत दाखल करण्यास कोणत्या कारणांमुळे झालेला आहे हे कुठेही नमुद केलेले नाही आणि या प्रकरणात अर्जदारांनी पुरावा दाखल केल्यामुळे प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या उलटतपासणी करीता हे प्रकरण नेमण्यात आलेले आणि या स्थितीला प्रतिवादी क्र. २ यांचा लेखी कैफीयत दाखल करणेसाठीचा अर्ज आलेला. त्यामुळे हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. २ यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास प्रदिर्घ विलंब झालेला आहे, त्यामुळे त्यांनी अर्जदारांना कॉस्ट म्हणुन रु. ७००/— प्रदान करावे आणि मगच त्यांची लेखी कैफीयत प्रकरणात दाखल करुन घेण्यात यावी.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2026.08.01 15:14:12 +0530

**दिनांक :— ०१/०८/२०२६** **(शार्दुल श. जहागिरदार)**

**न्यायाधीश,**

**ठिकाण :— बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**